॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. १६ जुलै २०२६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित विद्यापीठस्तरीय 'कुलगुरू युवा प्रेरणा शिबिर-२०२६' चा शिबीराचा समारोप  कुलगुरू प्रा व्ही एल माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली आज गुरुवार दि. १६ जुलै रोजी विद्यापीठात संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जळगावच्या महापौर दीपमाला काळे, व्यवस्थापन परिषद सदस्य नितीन झाल्टे, प्राचार्य शिवाजी पाटील उपस्थित होते.

या प्रसंगी वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील,  अधिसभा सदस्य प्रा. कांचन महाजन, स्वप्नाली काळे, भानुदास येवलेकर, सल्लागार समितीचे सदस्य प्राचार्य एस. टी. सोनवणे  राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. प्रवीण महाले यांची  उपस्थिती होती.

प्रमुख अतिथी म्हणून बोलताना महापौर श्रीमती दीपमाला काळे म्हणाल्या की, “विकसित भारत २०४७ हे केवळ शासनाचे स्वप्न नसून प्रत्येक युवक-युवतीचे राष्ट्रीय ध्येय आहे. त्या दिशेने वाटचाल करण्यासाठी विद्यार्थ्यांनी ज्ञान, कौशल्य, शिस्त, प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी हे गुण अंगीकारणे अत्यावश्यक आहे. शिक्षणाबरोबरच संवेदनशीलता, पर्यावरणप्रेम, राष्ट्रभक्ती आणि सेवाभाव या मूल्यांची जोपासना केली तरच सक्षम आणि आत्मनिर्भर भारत घडेल. युवकांनी व्यसनमुक्त राहून आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारावी, तंत्रज्ञानाचा विधायक वापर करावा आणि समाजाच्या विकासात सक्रिय सहभाग नोंदवावा. आजचे स्वयंसेवक उद्याचे जबाबदार नागरिक, सक्षम नेतृत्व आणि राष्ट्रनिर्माते ठरणार आहेत,” असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अध्यक्षीय समारोपात कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांच्या कार्याचे कौतुक केले. ते म्हणाले, “या शिबिरातून विद्यार्थ्यांनी श्रमसंस्कार, सामाजिक उत्तरदायित्व, पर्यावरण संरक्षण, नेतृत्व, शिस्त आणि सामूहिक कार्याची मूल्ये आत्मसात केली आहेत. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), डेटा सायन्स, रोबोटिक्स आणि आधुनिक तंत्रज्ञान हे जगाच्या प्रगतीचे प्रमुख आधारस्तंभ ठरणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नव्या तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळवून स्वतःला जागतिक स्पर्धेसाठी सक्षम बनवावे. विद्यापीठात उपलब्ध असलेल्या प्रयोगशाळा, संशोधन सुविधा, कौशल्य विकास केंद्रे आणि विविध शैक्षणिक संधींचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. समाजासाठी उपयुक्त संशोधन, नवकल्पना आणि उद्योजकता विकसित करून विकसित भारताच्या उभारणीत युवकांनी अग्रणी भूमिका बजावावी,” असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून विदयार्थी पुरुषोत्तम भोसले, गंगामाई महाविदयालय नगाव व वेदिका भोसले, जी.जी. खडसे महाविदयालय, मुक्ताईनगर यांना पुरस्कार देण्यात आले. या शिबीराचा अहवाल राष्ट्रीय सेवा योजना संचालक प्रा. प्रवीण महाले यांनी सादर केला. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा समन्वयक राजू गवारे, डॉ. विशाल करपे, संघ व्यवस्थापक डॉ. डी. आर. पाटील, डॉ. दीपक बावस्कर, डॉ. खोब्रागडे, डॉ. सुषमा समीर, डॉ. हर्षाली पाटील, तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे अधिकारी शरद पाटील, कैलास आवटी आणि सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## बातमी क्र. २

जळगाव, दि. १६ जुलै २०२६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागाअंतर्गत एम.एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण अंतर्गत ऑन-जॉब ट्रेनिंग (OJT) योजनेंतर्गत औद्योगिक प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव, आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख आणि कौशल्यविकास या उद्देशाने विद्यापीठाने नामांकित उद्योगांशी समन्वय साधला आहे.

या उपक्रमाअंतर्गत नाशिक येथील रिषभ इन्स्ट्रुमेंट्स लिमिटेडमध्ये १५ विद्यार्थ्यांची, तर जळगाव येथील मास-टेक कंट्रोल्स प्रा. लि.मध्ये ४ विद्यार्थ्यांची अशा एकूण १९ विद्यार्थ्यांची औद्योगिक प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. औद्योगिक ऑटोमेशन, ऊर्जा कार्यक्षमता आणि अचूक मोजमाप क्षेत्रात कार्यरत असलेल्या या कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना आधुनिक औद्योगिक तंत्रज्ञान, गुणवत्ता नियंत्रण, अत्याधुनिक उपकरणांचा वापर आणि व्यावसायिक कार्यपद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

रिषभ इन्स्ट्रुमेंट्स लिमिटेडच्या मानव संसाधन विभागाच्या एचआर करिश्मा खैरनार यांनी विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी आवश्यक सहकार्याची भूमिका घेतली. तसेच मास-टेक कंट्रोल्स प्रा. लि.चे संचालक श्री. चौधरी यांनी उद्योग-विद्यापीठ सहकार्याला प्रोत्साहन देत विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली, तर श्री. भारंबे यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअरसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव त्यांच्या करिअरसाठी महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. व्ही. पी. पाटील, स्कूल ऑफ फिजीकल सायन्सेसचे संचालक प्रा. जे. व्ही. साळी, इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख डॉ. डी. जे. शिराळे, विभागप्रमुख डॉ. एस. एस. घोष, डॉ. पी. जी. चव्हाण, डॉ. जसपाल बंगे आणि डॉ. राहुल साळुंखे यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

बातमी क्र. ३

जळगाव, दि. १६ जुलै २०२६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केबीसीएनएमयू सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस (KCIIL) तर्फे संशोधनाचे व्यावसायिकीकरण करून त्याचे स्टार्टअप्स, उद्योग व समाजोपयोगी उत्पादनांमध्ये रूपांतर करण्याच्या उद्देशाने 'Research to Commercialization – Cohort 11.0' या विशेष इन्क्युबेशन उपक्रमाचे अधिकृत उद्घाटन व माहितीपत्रकाचे अनावरण विद्यापीठाचे मा. कुलगुरू तथा केसीआयआयएलचे अध्यक्ष प्रा. विजय एल. महेश्वरी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी केसीआयआयएलचे संचालक डॉ. राजेश जवळेकर, सीए रवींद्र पाटील, प्रा. अरुण इंगळे, केसीआयआयएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नविन बी. खंडारे तसेच केसीआयआयएलचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना मा. कुलगुरू प्रा. विजय एल. माहेश्वरी यांनी सांगितले की, विद्यापीठात निर्माण होणारे संशोधन हे केवळ शोधनिबंधांपुरते मर्यादित न राहता त्याचे उद्योग, तंत्रज्ञान, स्टार्टअप्स आणि समाजोपयोगी उत्पादनांमध्ये रूपांतर होणे ही काळाची गरज आहे. 'Research to Commercialization – Cohort 11.0' हा उपक्रम संशोधकांना त्यांच्या संशोधनाचे व्यावसायिकीकरण करण्यासाठी आवश्यक असलेले तज्ज्ञ मार्गदर्शन, उद्योगांशी संवाद, बौद्धिक संपदा (IP) संरक्षण, तंत्रज्ञान हस्तांतरण, व्यवसाय मॉडेल विकास, गुंतवणूकदारांशी संपर्क तसेच स्टार्टअप उभारणीसाठी आवश्यक इन्क्युबेशन सुविधा उपलब्ध करून देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या उपक्रमाद्वारे **प्राध्यापक, संशोधक, पीएच.डी. व पदव्युत्तर संशोधक, विद्यार्थी, शास्त्रज्ञ, नवोपक्रमकर्ते, पेटंट धारक, प्रारंभिक टप्प्यातील तंत्रज्ञानाधारित स्टार्टअप्स तसेच विद्यापीठ व महाविद्यालयीन संशोधन गटांना** संशोधनापासून बाजारपेठेपर्यंतचा प्रवास सुलभ करण्यासाठी सर्वंकष मार्गदर्शन व सहकार्य दिले जाणार आहे.

या कोहोर्टच्या माध्यमातून निवड झालेल्या संशोधनाधारित प्रकल्पांना संरचित इन्क्युबेशन, प्रोटोटाइप व उत्पादन प्रमाणीकरण, बौद्धिक संपदा सहाय्य, तंत्रज्ञान हस्तांतरण, उद्योग सहकार्य, व्यवसाय विकास, गुंतवणूकदार संपर्क आणि व्यावसायिकीकरणासाठी आवश्यक सर्व प्रकारचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाईल. इच्छुकांनी **१६ ऑगस्ट २०२६** पूर्वी अर्ज सादर करण्याचे आवाहन त्यांनी केले.

'Research to Commercialization – Cohort 11.0' हा उपक्रम विद्यापीठातील संशोधनाला नवोपक्रम, उद्योग आणि उद्योजकतेची जोड देत संशोधनाचे समाजाभिमुख, तंत्रज्ञानाधारित आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम स्टार्टअप्समध्ये रूपांतर करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

.................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १६ जुलै, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता